# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र-१७७** **दिनांक - ०८/०५/२०२४**

## " ठोश्याबुक्यानी मारहान करुन, धमकी देऊन, अल्पवयीन मुलीवर बलात्कार करणाऱ्या नराधमास अवघ्या २४ तासांत अटक करण्यात मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश "

अर्नाळा पोलीस स्टेशन येथे दि.०६/०५/२०२४ रोजी पिडित मुलगी वय १७ वर्षे हिने फिर्याद दिली की, यातील आरोपीत याने जानेवारी २०२४ ते ०७/०४/२०२४ पोवतो फिर्यादी यांचे राहते पत्यावर पिडीत महिला हि अल्पवयीन आहे हे माहित असताना देखील तिच्याशी प्रेम संबध ठेवुन तु अठरा वर्षाची झाल्यानंतर आपण लग्न करु असे म्हणुन बळजबरीने वेळोवेळी शारिरिक संबध ठेवले तसेच तु माझ्याशी संबध ठेवले नाहीस तर सदर संबधाबाबत मी तुझ्या आईला सर्व सांगेल अशी धमकी दिली. तसेच फिर्यादीने आरोपी सोबतचे शारिरीक संबध तोडल्याचा राग मनात धरुन आरोपीने फिर्यादी व तीच्या आईला ठोश्याबुक्यानी मारहान करुन धमकी दिली म्हणून फिर्यादीने दिलेल्या तक्रारी वरुन अर्नाळा पोलीस ठाणे गु.रजि.नं. १८८/२०२४ भा.द.वि.सं. कलम ३७६ (२) (एन), ३२३, ५०६ सह बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४, ६, १२ प्रमाणे गुन्हा दाखल होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन सदर बाबत वरीष्ठ अधिकाऱ्यांना माहिती देऊन त्यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे एक पथक सपोनि/दत्तात्रय सरक, पोहवा/सतिष जगताप, पोहवा/महेश वेल्हे असे तात्काळ घटनास्थळी रवाना झाले. सदर ठिकाणी आरोपी बाबत गोपनिय माहिती घेऊन तांत्रिक विश्लेषन करुन आरोपी बाबत माहिती प्राप्त करुन पोलीस पथक कोंढवा, पुणे येथे जाऊन स्थानिक पोलीसांच्या मदतीने आरोपीचा शोध घेऊन आरोपी नामे धिरजकुमार बाळकृष्ण लडडा, वय २९ वर्ष, राह. रुम नं ५०१, एक्स विंग, बुरानी पार्क, कन्ट्रीवुड हबटावुन जवळ, तिलीकानगर, कोंढवा, पुणे शहर यास ताब्यात घेऊन त्याचेकडे गुन्हयासंदर्भात सखोल विचारपूस केली असता, सदरचा गुन्हा हा त्यानेच केल्याचे निष्पन्न झाले. आरोपीस ताब्यात घेवुन पुढील कारवाई कामी अर्नाळा पोलीस ठाणे यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई ही पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री अविनाश अंबुरे, मा. सहा. पोलीस आयुक्त श्री मदन बल्लाळ यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पो.नि. राहुल राख, पो.नि धनांजय पोरे, सपोनि/दत्तात्रय सरक, सपोनि/नितीन बेन्द्रे, पोउपनिरी/हितेंन्द्र विचारे, सहा.पो.उप.निरी/श्रीमंत जेधे, पोहवा/सतिष जगताप, पोहवा/महेश वेल्हे, पोहवा/हनुमंत सुर्यवंशी, मसुब सचीन चौधरी सर्व नेमणुक मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा, सहा.पो.उप.निरी संतोष चव्हाण, सायबर सेल यांनी यशस्वी केलेली आहे.